Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

४८ /२०२६

विषय- **"SHE TALK"** उपक्रमांतर्गत आयोजित महिलांचा आरोग्याविषयी संवादविषयक कार्यक्रमाला उपस्थित राहणेबाबत.

सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, बेटी बचाओ अभियान आणि स्वयंसिध्दा सेंटर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.०९ ऑक्टोंबर २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता **"SHE TALK"** उपक्रमांतर्गत महिलांचे आरोग्य आणि त्यांना उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्या या विषयावर आधारित संवादविषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

सदरचा कार्यक्रम हा राजर्षी शाहू सभागृह, मुख्य प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी डॉ.श्रीमती विनिता रानडे (वैद्यकीय अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) आणि श्रीमती उर्मिला शुभंकर (समुपदेशक) या मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठातील सर्व महिला शिक्षक, शिक्षकेत्तर महिला अधिकारी/कर्मचारी तसेच रोजंदारी/हंगामी महिला कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/2173
दिनांक : 07 OCT 2026
प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. मा.कुलगुरु/प्र-कुलगुरू/कुलसचिव/संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ/वित व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास माहितीसाठी.
५. इंटरनेट सेल - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (INTRANET)

सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व महिला शिक्षक व प्रशासकीय महिला सेवकांच्या निदर्शनास आणावे.